Coverage – Print, Electronic

# विद्युत सुरक्षा सप्ताहनिमित्त पथनाट्याद्वारे जागृती!

## शैक्षणिक : तळेगाव येथे आंबीतील डॉ. डी. वाय. पाटीलच्या विद्युत विभागातील विद्यार्थ्यांचा सहभाग

**कामशेत, दि. २१ (वार्ताहर)** - तळेगाव येथे आंबी येथील डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँड टेकच्या विद्युत विभागातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभागातर्फे घोषित विद्युत सुरक्षा सप्ताहनिमित्त विद्युत सुरक्षा विषयावर जनजागृतीपर पथनाट्य सादर केले.

विद्युत सुरक्षेचे महत्व व विद्युत उपकरणे वापरताना घ्यायची काळजी या संबंधी विद्यार्थ्यांनी जनतेस माहिती दिली. त्याचे महत्व सांगितले. यावेळी विद्यार्थ्यां सोबत प्राध्यापक वृंद सुद्धा हजर होते.

या सप्ताह अंतर्गत विद्युत विभागातील विद्यार्थ्यांनी सुरक्षेविषयी विविध कार्यक्रम आयोजित केले होते. यामध्ये प्रामुख्याने अग्निशामक विभागतर्फे अग्निशामक अधिकारी स्वप्नील खडपकर यांनी सुरक्षेचे प्रात्यक्षिके करून दाखविण्यात आले. तसेच तांत्रिक निबंध आणि पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

संस्थाप्रमुख पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाचे संस्थापक डॉ. विजय डी. पाटील व महाविद्यालयाचे संकुल संचालक डॉ. रमेश वसप्पानावर यांच्या प्रेरणेने या विद्युत सुरक्षा सप्ताहची सुरुवात झाली. डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली या विद्युत सुरक्षा सप्ताहचे आयोजन करण्यात आले.



तळेगाव : विद्युत सुरक्षा सप्ताहनिमित्त पथनाट्याचे सादरीकरण करताना डॉ. पाटील महाविद्यालयाचे विद्यार्थी.

विद्युत विभाग प्रमुख प्रा. नरेंद्र झिंजाड यांनी या सप्ताहचे नेतृत्व केले. महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभाग प्रमुख आणि अन्य शिक्षक, महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी बी. एस. गायकवाड आणि महाविद्यालयाचे प्रबंधक अधिकारी अशोक पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

प्रभात Tue, 22 January 2019
epaper.eprabhat.net/c/36006446



तळेगाव येथे पथनाट्य सादर करताना विद्यार्थी.

## विद्युत सुरक्षा सप्ताहानिमित्त पथनाट्य

**कामशेत :** आंबी येथील डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंगच्या विद्युत विभागातील विद्यार्थ्यांनी शासनाच्या उद्योग ऊर्जा व कामगार विभागातर्फे घोषित विद्युत सुरक्षा सप्ताहानिमित्त विद्युत सुरक्षा विषयावर तळेगाव येथे जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. विद्युत सुरक्षेचे महत्व व विद्युत उपकरणे वापरताना घ्यायची काळजी यासंबंधी माहिती दिली. यावेळी प्राध्यापक वृंद हजर होते. कार्यक्रमात अग्निशामक विभागातर्फे अग्निशामक अधिकारी स्वप्निल खडपकर यांनी सुरक्षेसंदर्भात प्रात्यक्षिके करून दाखविली. कार्यक्रमासाठी पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाचे संस्थापक डॉ. विजय डी. पाटील व संकुल संचालक डॉ. रमेश वसप्पानावर यांच्या प्रेरणेने या विद्युत सुरक्षा सप्ताहाची सुरुवात झाली. प्राचार्य डॉ. लक्ष्मण कांबळे, प्रा. नरेंद्र झिंजाड, बी. एस. गायकवाड, अशोक पाटील आदींनी परिश्रम घेतले.



**आंबी : डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँण्ड टेक्नॉलॉजीच्या विद्युत अभियांत्रिकी विभागात राज्य सरकारच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने आयोजित केलेल्या विद्युत सुरक्षा सप्ताहाची उत्साहात सुरवात झाली.**

# विद्युत सुरक्षा जनजागृती महत्त्वाची : महेंद्र जगताप

**वडगाव मावळ, ता. १४ :** निष्काळजीपणामुळे होणारे विद्युत अपघात लक्षात घेता ग्रामीण भागात विद्युत सुरक्षा जनजागृती महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र सरकारच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे विद्युत निरीक्षक महेंद्र जगताप यांनी केले.

मावळ तालुक्यातील आंबी येथील डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँण्ड टेक्नॉलॉजीच्या विद्युत अभियांत्रिकी विभागात महाराष्ट्र सरकारच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या वतीने ११ ते १७ जानेवारीदरम्यान विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी जगताप बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. लक्ष्मण कांबळे होते. विद्युत निरीक्षक शिवराज दुधे, विद्युत विभाग प्रमुख नरेंद्र झिंजाड आदी उपस्थित होते. जगताप यांनी या वेळी विद्युत सुरक्षेचे महत्त्व, विद्युत उपकरणे वापरताना घ्यावयाची काळजी, विद्युत सुरक्षेसंबंधी नवीन नियमावली व निष्काळजीपणामुळे होणारे अपघात याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

त्यांनी सांगितले, की ग्रामीण भागात निष्काळजीपणामुळे मोठ्या प्रमाणावर विद्युत अपघात होतात. त्यामुळे याबाबत सुरक्षा जनजागृती महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी याकामी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. नरेंद्र झिंजाड यांनी प्रास्ताविकात सप्ताहातील पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा, विद्युत सुरक्षा जनजागृती फेरी, पथनाट्य आदी उपक्रमांच्या नियोजनाची माहिती दिली. प्राचार्य लक्ष्मण कांबळे यांनी स्वागत केले. नियोजन समिती प्रमुख प्रा. प्रवीण फुटाणे यांनी आभार मानले. विद्युत विभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी वृंदाने सप्ताहाचे संयोजन केले आहे.